# ईसीई इंडिया एनेर्जीसमध्ये ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा






अमरावती दि. १६: अमरावती शहरातील सोलर पीव्ही मोड्युल्सचे उत्पादन करणाऱ्या ईसीई इंडिया एनेर्जीस मध्ये ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. व्ही. टी. इंगोले, डवोकेट धनंजय तोटे, सुरेश भगत, विद्याधर इंगोले आणि ईसीई इंडिया एनेर्जीसचे व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकर आणि संचालक समीर काळे, अनिकेत तोंडारे, सूरज गावंडे, श्रीकांत तिखीले व सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात झेंडावंदनाने करण्यात आली. त्यानंतर ईसीई तर्फे सर्व कर्मचारी वर्गाकरिता स्थापन करण्यात आलेल्या ज्ञान केंद्राचे उद्घाटन प्रमुख अतिथींच्या व ईसीई इंडिया एनेर्जीसच्या स्वप्नील चांदणे यांच्या हस्ते करण्यात आले आणि या सोबतच प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ईसीई इंडिया एनेर्जीसच्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले.

पुढील कार्यक्रमात ईसीई इंडिया एनेर्जीस तर्फे प्रिवेंशन ऑफ सेक्शुअल हरासमेंट (पॉश) या नविन धोरणाची घोषणा करण्यात आली आणि धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता स्थापित झालेल्या समितीचे स्वागत या समितीच्या अध्यक्षा पूजा काळबांडे आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर या समितीचे सल्लागार डवोकेट धनंजय तोटे यांनी पॉशचे महत्व उपस्थितांना सांगितले.

त्यानंतर ईसीई इंडिया एनेर्जीसच्या नविन लोगोचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आणि सर्व कर्मचाऱ्यांना या नविन ब्रँड बदलाची माहिती ईसीई इंडिया एनेर्जीसच्या सुमेधा क्षत्रिय यांनी दिली. या नव्या ब्रँडिंग साठी अतोनात मेहनत केलेल्या टीमचे स्वागत व सत्कार डॉ. व्ही. टी.

ECE INDIA

इंगोलेंच्याहस्ते घेण्यात आला. यानंतर ईसीई इंडिया एनेर्जीसमध्ये पाच आणि त्याहून अधिक वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार घेण्यात आला. यामध्ये शेखर लहू, आनंद मोरे, गोविंद जोशी, मंगेश काकपुरे, रोहित भागवत, संकेत गडेकर आणि विशाल वायले यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते घेण्यात आला.

ईसीई इंडिया एनेर्जीसचे व्यवस्थापकीय संचालक अमित आरोकर यांनी कंपनीच्या आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती दिली आणि पुढील वाटचालीसाठी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये त्यांनी कंपनीद्वारे सुरू करण्यात आलेल्या उन्नति या नविन प्रकल्पाची माहिती दिली आणि कशा प्रकारे या प्रकल्पाद्वारे कंपनी नवनवीन शिखरे गाठेल यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ईसीई इंडिया एनेर्जीसचे तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्ही. टी. इंगोले यांनी सर्व उपस्थितांचे मार्गदर्शन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यानंतर कार्यक्रमाची सांगता रिफ्रेशमेंटने करण्यात आली. शेवटी कर्मचाऱ्यांसाठी विविध मनोरंजक कार्यक्रमांचे व खेळांचे आयोजनदेखील ईसीई इंडिया एनेर्जीस कडून करण्यात आले होते. या कार्यक्रमास सर्वच कर्मचाऱ्यांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.